# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

## परिपत्रक

क्र./ मऔविम/मुनि/P१९७३८२/२०२४ दिनांक:- १५/०३/२०२४.

विषय: माहिती तंत्रज्ञान भूखंडाबाबत महामंडळाच्या धोरणामध्ये सुधारणा करणेबाबत.

महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहिती व तंत्रज्ञान भूखंडांच्या संदर्भात विकास कालावधी, गाळ्यांचे हस्तांतरण, सह विकासक नियुक्ती इत्यादी मुद्द्यांबाबत उद्योजकांना येणा-या अडीअडचणींच्या अनुषंगाने स्थापन करण्यात आलेल्या अभ्यास गटाचे अभिप्राय संचालक मंडळाच्या दि.०६/०३/२०२४ रोजी झालेल्या ३९९ व्या बैठकीत निर्णयासाठी सादर करण्यात आले होते. सदर प्रकरणी संचालक मंडळाच्या सभेत सविस्तर चर्चा होवुन त्यासंदर्भात विषय क्र. ८३ ठराव क्र. ६७९१ पारित करण्यात आला. सदर ठरावानुसार महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहीती व तंत्रज्ञान भूखंडासाठी विकास कालावधी, गाळे हस्तांतरण, सह विकासक नेमणुक इत्यादीबाबत सुधारीत धोरण खालीलप्रमाणे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१. महामंडळाच्या औद्योगिक क्षेत्रातील माहिती तंत्रज्ञान भूखंडासाठी भूखंडाचा विकास कालावधी खालील प्रमाणे असेल.

| अ. क्र. | इमारतीची उंची | विकास कालावधी (वर्षे) |
|---|---|---|
| १ | ३६ मी पर्यंत | ३ |
| २ | ३६ मी ते ७० मी | ४ |
| ३ | ७० मी पेक्षा जास्त | ५ |

सदर विकास कालावधी संपल्यानंतर भूखंडधारकास महामंडळाच्या प्रचलित धोरणानुसार मुदतवाढ घ्यावी लागेल.

२. माहिती तंत्रज्ञान उद्यानातील ज्या भूखंडाना RERA Act लागू आहे व ज्या भूखंडधारकांनी RERA रजिस्ट्रेशन करून घेतले आहे अशा भूखंडधारकांनी बांधकाम सुरु केल्यानंतर प्रथम गाळे हस्तांतरणाची परवानगी देण्यात यावी.

३. महामंडळाने दिनांक १२/०५/२०२३ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रक क्र. मऔविम/भूमी/ए८४१५८ नूसार अर्जदाराने हस्तांतरणाची विनंती केल्यास, माहिती व तंत्रज्ञान उद्यानातील गाळ्यांच्या दुसऱ्या हस्तांतरणाकरीता प्रचलित धोरणानूसार हस्तांतरण शुल्क वसुल करून परवानगी देण्यात यावी.

४. महामंडळाने विशेष आर्थिक क्षेत्रामध्ये दिनांक ११/११/२००९ चे परिपत्रकान्वये विशेष आर्थिक क्षेत्रात (SEZ) वाटप केलेल्या भूखंडांच्या विकासासाठी सह विकासक ( Co-Developer) नेमण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. सदर धोरण माहिती तंत्रज्ञान भूखंडासाठी खालील अटी व शर्तीसह लागू करण्यात यावे.

अ. माहिती तंत्रज्ञान उद्यानासाठी वाटप /हस्तांतरण करण्यात आलेल्या भूखंडासाठी सदर धोरण लागू राहील.

ब. भाड्याने वा हस्तांतर केलेले क्षेत्र हे संबधीत कंपनीस आय.टी. साठीच वापरता येईल.

क. महामंडळाचे या संबधातील वेळोवेळी लागू करण्यात आलेले प्रचलित धोरण यासाठी लागू राहील.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in

ड. भूखंडधारकास जर भूखंड विकास करणेसाठी सह-विकासक/संयुक्त उपक्रम ( Co-Developer/ Joint Venture) नेमावयाचा असेल तर बांधकामावर आधारीत प्रचलित दराने हस्तांतरण शुल्क वसूल करून तशी परवानगी देण्यात यावी.

इ. भूखंडधारकाने हस्तांतरण व सह-विकासक/ संयुक्त उपक्रम (Co-Developer/ Joint Venture) याचा एकत्रित प्रस्ताव सादर केल्यास भूखंडधारकाकडून सह-विकासक/संयुक्त उपक्रम (Co-Developer/ Joint Venture) नेमण्यास परवानगी देण्यासाठी बांधकामावर आधारीत Co-Developer शुल्क वसूल करण्यात यावे व हस्तांतरणाच्या प्रस्तावावर सुध्दा बांधकामावर आधारीत हस्तांतरण शुल्क वसूल करण्यात यावे.

ई. सदर धोरणासाठी कालमर्यादा विहीत करण्यात येत नाही.

सदर परिपत्रक माहीती व तंत्रज्ञान विभागाच्या सहमतीने आणि मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

मुख्य नियोजक

**मऔविम, मुंबई-९३.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/छ. संभाजीनगर / नागपूर
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/ पुणे/ छ. संभाजीनगर /नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/ व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१३. सर्व औद्योगिक संघटना.
१४. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यु.टी.सी.), कफ परेड, मुंबई.

midcconsultants.in

For any requirements related to MIDC, please call us at +91 98338 32485 or email us at info@midcconsultants.in